## महिला दिनी......विसरू नकोस

विसरू नकोस....
तुझ्यासाठी शिडी धरून,
उभ्या असलेल्या,
प्रत्येक पुरूषाला.......

विसरू नकोस.....
तुला प्रकाश दाखवून,
मार्ग दाखवणाऱ्या,
प्रत्येक दिव्याला....

विसरू नकोस....
तुझे बोट धरून,
तुला चालायला शिकवणाऱ्या,
प्रत्येक आधाराला

विसरू नकोस.....
ढाल होऊन,
तुझे कष्ट झेलणाऱ्या,
प्रत्येक हाताला....

विसरू नकोस...
तुझे अश्रू पुसून,
तुला हसरे करणाऱ्या,
प्रत्येक चेहऱ्याला....

आजच्या महिला दिनी...
विसरू नकोस...
तुला समान समजून,
हात धरून चालणाऱ्या,

या समाजाला...

विसरू नकोस.....
तुला मोठे करून,
अंधारात रहाणाऱ्या,
प्रत्येक व्यक्तिला!....

विसरू नकोस...
तुझ्या ओंजळीत, फुले घालून,
तुला सावली देणाऱ्या,
प्रत्येक झाडालां.....

विसरू नकोस.....
तुझ्या आयुष्यात, रंग भरून,
तुझे आयुष्य रंगबेरंगी करणाऱ्या,
प्रत्येक जीवाला.....

विसरू नकोस...
तुला आदर्श मानून,
तुझ्या मागून येणाऱ्या,
प्रत्येक महिलेला, हात द्यायला!

**..............चित्रा मेहेंदळे**